# प्रतिष्ठानचे पुरस्कार - २०२०

**समस्त भिडे कुलबंधु/भगिनी आणि माहेरवाशिणींकरिता**

भिडे प्रतिष्ठानकडून भिडे कुलसंमेलनात खालील पुरस्कार देण्यात येतात. त्याकरिता खाली दिलेल्या निकषानुसार आपले नामांकन, पूर्ण नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण, कौटुंबिक माहिती आत्तापर्यंत मिळालेल्या पुरस्कारासंबंधी माहिती व त्याच्या सत्यप्रति (झेरॉक्स) व **आपला आयकार्ड साईज फोटोसह**

**सौ. सुप्रिया प्रशांत भिडे,**
**१५, व्यंकटपुरा पेठ, फ्लॅट नं. ६, देविका अपार्टमेंट, मंगळवार तळे, सातारा - ४१५ ००२.**
**e-mail : prashantbhide53@gmail.com किंवा dilip.bhide15@gmail.com**
**फोन नं. : ०२१६२-२८४३५८ किंवा ९४२३८६६१७०**
**ह्या पत्त्यावर दि. ३० नोव्हेंबर, २०१९ पर्यंत पाठवावेत.**

नामांकन देणारी व्यक्ती स्वत: किंवा त्याच्या नातेवाईकांनी वरील माहितीसह पाठविली तरी चालणार आहे.

**पुरस्काराचे स्वरूप :** शाल, श्रीफळ, प्रशस्तिपत्रक व रोख रक्कम इ.

१) **साहस किंवा क्रीडा पुरस्कार** - भिडे कुटुंबातील साहसीवृत्तीय किंवा क्रीडा क्षेत्रामध्ये चमकदार कामगिरी करणाऱ्या भिडे कुलोत्पन्न व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो. [श्री. रा. म. भिडे पुरस्कृत श्रीकृष्ण महादेव भिडे स्मृति साहस पुरस्कार]

२) **'माझी आई' पुरस्कार** - भिडे कुलोत्पन्नातील गृहिणी, जेष्ठ स्त्री, तसेच अल्प उत्पन्न व प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाऊन मुलांकरीता किंवा स्वतःच्या कुटुंबाकरीता विशेष कार्य करणारी स्त्री. [श्री. रविंद्र रावजी भिडे, कल्याण पुरस्कृत त्यांच्या मातोश्री कै. सुशिला रावजी भिडे ह्यांचे स्मरणार्थ]

३) **'आपली सून' पुरस्कार** - सुसंस्काराचा वारसा सतत पुढे नेण्याचे कार्य करणारी किंवा विशेष प्राविण्य अथवा विशेष पारितोषिक मिळालेली किंवा समाज कार्यात अग्रेसर असणारी किंवा अध्यात्मिक क्षेत्रात प्रचारकार्य करणारी किंवा विशेष लेखन करणारी किंवा प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन मुलांसाठी, कुटुंबासाठी विशेष धडपड करणारी असावी. (सौ. मेधा उर्फ अनुराधा अविनाश भिडे, मिरज पुरस्कृत)

४) **'कला' पुरस्कार** - संगीत, नाटक, सिनेमा किंवा इतर कला क्षेत्रातील काम करणारी खास भिडे व्यक्ती असावी. (श्री. कुमार आणि वसंत विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत, यांचे बंधू कै. सुभाष विष्णू भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ)

४) **उद्योजक पुरस्कार** - लघुउद्योजक किंवा नव्याने व्यवसाय, उद्योग सुरू केलेला धडाडीने, कष्टाने, प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा नेटाने व्यवसाय वृद्धी करणाऱ्या तरुण भिडे व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो. (श्री. कुमार विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत यांचे वडील कै. विष्णू विनायक तथा अण्णासाहेब भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ)

६) **आदर्श कार्यकर्ता पुरस्कार** - भिडे कुलोत्पन्नामधील पुरस्कार स्वीकारणारी व्यक्ती प्रतिष्ठानचे कार्य करणारी आणि कोणत्याही वयाची असावी, हा पुरस्कार कै. दामोदर (दामुकाका) केशव भिडे, डोंबिवली यांचे स्मरणार्थ त्यांची कन्या सौ. नेहा सातर्डेकर-भिडे, डोंबिवली पुरस्कृत.

७) **वैदिक पुरस्कार** - पौरोहित्य अथवा वेदविद्या शिकणाऱ्या विद्यार्थी अथवा विद्यार्थिनीस किंवा कीर्तन शिकणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस हा पुरस्कार दिला जाईल. ही व्यक्ती भिडे कुलातील असावी. (कै. अहिताग्नी विश्वनाथ नारायण आणि श्रीमती दुर्गाबाई भिडे यांचे स्मरणार्थ त्यांचे पुत्र कै. वामन वि. भिडे आणि श्रीमती सुमती वा. भिडे, पुणे पुरस्कृत.)

८) **संस्कृत पुरस्कार** - संस्कृत विषय घेऊन डॉक्टरेट (पीएच.डी.) किंवा एम.ए. करणाऱ्या पुरुष अथवा स्त्री व्यक्ती तसेच भिडे कुलातील असावी. (कै. डॉ. विद्याधर विश्वनाथ भिडे ह्यांचे स्मरणार्थ त्यांचे बंधू कै. वामन विश्वनाथ भिडे व श्रीमती सुमती वा. भिडे, पुणे पुरस्कृत.)

९) **माहेरचा मान** - दरवर्षी भिडे कुल संमेलनामध्ये माहेरवाशिणींचा सन्मान व्हावा ह्यादृष्टीने आपली माहेरवाशीण आणि प्रतिष्ठानच्या ज्येष्ठ श्रीमती शशीताई मु. घुले, पुणे पुरस्कृत आणि त्यांचे आई-वडील कै. सरस्वती व कै. भालचंद्र भिडे यांचे स्मरणार्थ 'माहेरचा मान' १५व्या भिडे कुलसंमेलनापासून दरवर्षी देण्यात येतो. पुरस्कर्त्यांनी देणगी दिलेल्या व्याजातून हा सन्मान करावयाचा आहे. संमेलनामध्ये उपस्थित असणाऱ्या सर्व भिडे माहेरवाशिणींमधून सोडतीद्वारे (ड्रॉ पद्धतीने) याची निवड केली जाईल.

# विवाह सुवर्णोत्सव

**ज्या भिडे कुल बंधू, भगिनी आणि माहेरवाशिणी दांपत्यांच्या विवाहाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत किंवा झालेली आहेत अशा दांपत्यांनी लग्न झाल्यापासून आपल्या जोडीदाराच्या साथीने व्यतीत केलेली ५० वर्षांतील एखादी संस्मरणीय आठवण, घटना किंवा अनुभव शब्दबद्ध करावेत. लेखन/कविता १५० शब्दांपेक्षा शक्यतो जास्त असू नये. तसेच लेखाबरोबर दोघांचा फोटो पाठवावा. त्याचप्रमाणे आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक आणि घराणे लिहिणे आवश्यक आहे. असे लेख/कविता 'आम्ही भिडे' अंकामध्ये प्रकाशित केले जातील.**

**✻ अधिक माहितीसाठी संपर्क : दिलीप भिडे, पुणे मो. 9657541236 किंवा ले. क. सुनिल भिडे (पुणे) मो. 9623017444 किंवा ई-मेलसाठी office@bhidekul.in व dilip.bhide15@gmail.com येथे पाठवावेत.**